क्र.पुरवठा/जिपुअ-9/अ.का.वाहतुक/कावि- 960 /2017.
जिल्हाधिकारी नागपूर यांचे कार्यालय,
नागपूर, दिनांक१९ मे, 2017.

# जिल्हाधिकारी कार्यालय,नागपूर

(पुरवठा शाखा)

## ई-निविदा सूचना

जिल्हाधिकारी,तथा अध्यक्ष जिल्हा स्तरीय समिती नागपूर यांच्याकडून नागपूर जिल्हयासाठी लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरिता निश्चित केलेल्या सुधारित धान्य वितरण पध्दतीनुसार भारतीय अन्न महामंडळाचे गोदाम ते जिल्हयातील शासकीय गोदाम व जिल्हयातील शासकिय गोदाम ते रास्तभाव दुकानापर्यंत सन 2017 ते 2020 या तीन वर्षाचे कालावधीकरीता एकाच वाहतूकदारा मार्फत शासकीय खर्चाने अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाहतूकीसाठी पहिल्या व दुसऱ्या टप्प्याच्या वाहतुकी करीता इच्छुक वाहतूक कंत्राटदाराकडून द्वि लिफाफा पध्दतीने ई-निविदा दि. 22-05-2017 ते दि. 12-06-2017 रोजी दुपारी 02-00 वाजेपर्यंत ई-निविदा(ऑन लाईन) पध्दतीने मागविण्यात येत आहे. विहित मुदतीत प्राप्त न होणाऱ्या तसेच अटी पूर्ण न करणाऱ्या व निविदाकाराचे अटी युक्त निविदा अपात्र ठरविण्यात येतील.

मुदतीत व विहित प्रमाणात प्राप्त निविदा जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष जिल्हा स्तरीय समिती अगर त्यांचे प्रतिनिधी दिनांक 13-06-2017 रोजी दुपारी 03-00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे उघडतील. त्यावेळी सर्व इच्छुक निविदाकारांनी किंवा त्यांचे अनुपस्थितीत त्यांनी लेखी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींनी हजर राहावे.

निविदा फॉर्म व निविदासंबंधी **अटी व शर्ती बाबत महाराष्ट्र शासन** अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक कंत्राट 1016/ प्र.क्र. 169/ना.पु.16-अ, दिनांक 20 एप्रिल,2017 ची प्रत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा फॉर्म व शासन निर्णयाची प्रत जिल्हा पुरवठा अधिकारी नागपूर कार्यालयात दि. 12-06-2017 रोजी दु.12.00 पर्यंत पहावयास उपलब्ध असेल.

निविदा फॉर्मची किंमत रु.10,000/-(अक्षरी रु.दहा हजार) एवढी राहील,ती नापरतावा आहे.

इच्छुक निविदाकारांनी ई-निविदा प्रक्रियेत भाग घेणे सुलभ होणेसाठी जिल्हाधिकारी,तथा अध्यक्ष जिल्हा स्तरीय समिती यांचे कार्यालयात दि. 26-05-2017 रोजी दुपारी 12.00 वाजता Pre-bid Conference आयोजित केलेली आहे.

**जिल्हाधिकारी,तथा**
**अध्यक्ष, जिल्हा स्तरीय समिती**
**नागपूर**